| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १५४ वा | मंगळवार दिनांक २६ ऑगस्ट, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत १.५० ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)

(सांज दैनिक) पोष्ट परवाना

L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

dainiklatursamachar@gmail.com

बातम्या, लेख व जाहिरातीसाठी
लातूर समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### माल मोटार व रिवायडिंग वायरची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- वाशी पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी खुर्शीद अकबर शेख, वय ३५ वर्षे, रा. भातअंतरवली ता. गेवराई जि. बीड यांचे अंदाजे ५३,००० किंमतीची माल मोटार व रिवायडिंग वायर हा टेम्पोतुन दि.२२.०८.२०२५ रोजी पार्डी फाटा ते सरमकुंडी फाटा हायवे रोडच्या पेट्रोल पंप पाठीमागे राजस्थानी धाब्याजवळुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-खुर्शीद शेख यांनी दि.२३.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### टेम्पोतील माल गेला चोरीला

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-जुबेर शब्बीर शेख, वय ३५ वर्षे, रा. वाळुज ता. गंगापुर जि. छ. संभाजीनगर यांचे ताब्यातील टेम्पोतील अंदाजे १२,६९६ किंमतीचा माल एक सेंन्सोडेंड कंपनीचे टुटपेस्टचा बॉक्स टेम्पोतुन दि.२१.०८.२०२५ रोजी ११.४२ वा. सु. पारगावचे पुढे हायवे एनएच ५२ रोडवर अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-जुबेर शेख यांनी दि.२३.०८.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### सहा मोठ्या बकऱ्याची चोरी

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी बालाजी विश्वनाथ भातलवंडे, वय ४५ वर्षे, रा. दहिफळ ता. कळंब जि. धाराशिव यांचे दहिफळ मधील शेत गट नं २४४ मधील पत्र्याच्या शेड चे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि. २२.०८.२०२५ रोजी तोडून शेडमधील ६ मोठी बकरी एकुण ६०,००० किंमतीची चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-बालाजी भातलवंडे यांनी दि.२३.०८.२०२५ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३४ (४), ३०५ (ए) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### ट्रॅव्हल्सच्या धडकेने मृत्यू: गुन्हा दाखल

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत मयत विलास लक्ष्मण गंधुरे, वय ४७ वर्षे, रा. इंदीरा नगर कळंब ता. कळंब जि. धाराशिव हे दि.१७.०८.२०२५ रोजी येरमाळा ते कळंब येणारे रोडवर सार्वजनिक बांधकाम कार्यालयाचे समोरुन पायी चालत जात होते. दरम्यान ट्रॅव्हल्सचा चालकाने चालवून विलास गंधुरे यांना पाठीमागुन धडक दिली. या अपघातात विलास गंधुरे हे गंभीर जखमी होवून मयत झाले. जखमीस उपचार कामी घेवून न जात वाहनासह पसार झाला. अशा मजकुराच्या फिर्यादी स्वाती गंधुरे, रा. इंदीरानगर कळंब यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आह

## जुगार विरोधात,उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांची कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेशकुमार राऊत उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, धाराशिव यांचे आदेशावरुन उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, धाराशिव यांचे पथक धाराशिव उप विभागातील अवैध धंद्यांविषयी माहिती काढून कायदेशीर कारवाई करण्यासाठी दि.२३.०८.२०२५ रोजी धाराशिव जिल्ह्यात गस्तीस होते. पथकास माहिती मिळाली की, मोईन रा. खाजा नगर धाराशिव यांचे भावाचे गावसुद गावाचे रोडलगत असलेल्या शेतातील बंदीस्त रुममध्ये काही इसम तिरट जुगार खेळत आहेत. यावर पथकाने नमूद ठिकाणच्या शेडमध्ये छापा टाकला असता तेथे १. शहेद २. देविदास ३. जुबेर तिघे रा. खाजा नगर धाराशिव ता. जि. धाराशिव, ४. बाळासाहेब, ५. रफिक ६ शेखर, ७ सिध्दांत ८.सचिन हे सर्व लोक तिरट जुगार खेळत असताना पथकास मिळुन आले. नमूद जुगार अड्ड्यावरुन जुगार साहित्यासह रोख रक्कम असा एकुण ३,४२,४६० किं. चा मुद्देमाल पोलीसांनी जप्त केला असुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम- ४,५ अंतर्गत धाराशिव ग्रामीण पो.ठा. येथे गुन्हा नोंदवला आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेशकुमार राऊत उपविभागीय पोलीस अधिकारी, धाराशिव यांचे आदेशावरुन उपविभागीय पोलीस अधिकारी, कार्यालयाचे पथक पोलीस हावलदार हुसेन सय्यद, नागेश गरड, विठ्ठल गरड, लहु पाटील, अनिल मोरे यांचे पथकाने केली आहे.

## लघु पाटबंधारे विभागाच्या कामातुन शेतकऱ्यांच्या सिंचन क्षमतेत वाढ

धाराशिव, (जिमाका) – शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी लघु पाटबंधारे विभागाकडून विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात येत असून जिल्ह्यात सिंचन क्षमतेत लक्षणीय वाढ होत आहे.जिल्हा परिषदेच्या मालकीच्या लघु पाटबंधारे योजनांमध्ये एकूण १९४७ कामांचा समावेश आहे.यामध्ये ९८३ कोल्हापूर पद्धतीचे बंधारे,३७ सिंचन व साठवण तलाव,४८० पाझर तलाव,७४ गाव तलाव व ३७२ सिमेंट नाला बंधारे यांचा समावेश असून या सर्वांची एकूण साठवण क्षमता ५९९८ द.ल.घ.फु. आहे.या क्षमतेतून ५२ हजार ५०० हेक्टर क्षेत्र अप्रत्यक्षपणे सिंचनाखाली येत आहे.

**जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५**

अंतर्गत लघु पाटबंधारे योजनांच्या दुरुस्तीची ६५ कामे हाती घेण्यात आली होती.त्यापैकी ३८ कामे पूर्ण झाली असून १५ प्रगतीपथावर आहेत.९ कामे सुरू न झालेली असून ३ कामे निविदास्तरावर आहेत. याशिवाय याचअंतर्गत नवीन ८४ कामांना ९४४.२० लाखांची प्रशासकीय मान्यता मिळाली असून ती सर्व कामे निविदास्तरावर आहेत.

कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीची ६६ कामे मंजूर झाली होती. त्यापैकी २६ पूर्ण झाली आहे. २९ प्रगतिपथावर असून ८ कामे सुरू व्हायची आहेत.३ कामे निविदा स्तरावर आहेत.३३ नवीन कामांना २९६.९० लाखांची मान्यता मिळाली आहे.या दोन्ही मिळून १२४१.१० लाखांच्या कामांना मान्यता देण्यात आली असून त्यातून १७५२.६० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

**अटल भूजल योजना २०२३ -२४**

या योजनेत पाझर तलाव दुरुस्तीची ९, को.प.बंधारे दुरुस्तीची ९७,सिमेंट नाला बांध बांधकामाची ४ आणि नाला खोलीकरण-रुंदीकरणाची ७ अशी एकूण ११७ कामांना ७३०.३५ लाखांची मान्यता मिळाली होती. यापैकी आजअखेर ७२ कामे पूर्ण झाली आहेत, ३० प्रगतीपथावर असून ११ कामे स्थानिक अडचणींमुळे सुरू व्हायची आहेत.या कामांवर आतापर्यंत ३५१ लक्ष रुपये खर्च झाला असून १००० हेक्टर क्षेत्र ओलीताखाली येणार आहे.

**जलयुक्त शिवार अभियान २.०**

सन २०२३-२४ मध्ये या योजनेत २२५ कामांना २४५१.७५ लाखांची मान्यता मिळाली होती.त्यात तलाव दुरुस्तीची २२,कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे दुरुस्तीची ४०,नवीन सिमेंट नालाबांधाची ७५,नाला खोलीकरण ५१ आणि गॅबीयन बंधाऱ्यांची ३७ कामे समाविष्ट आहेत. त्यापैकी १३४ कामे यशस्वीरित्या पूर्ण झाली आहेत.

या सर्व योजनांमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पाण्याचा शाश्वत पुरवठा सुनिश्चित होत असून,सिंचन क्षेत्र वाढीसोबत शेती उत्पादनक्षमता उंचावणार आहे.

## शेकडो चिमुकल्या हातांनी साकारले मातीचे गणपती बाप्पा:श्री संत बोधले महाराज प्राथमिक शाळेत कळंब रोटरी क्लबचा पर्यावरणपूरक उपक्रम



कळंब (प्रतिनिधी)-सर, मला गणपतीचा हात बनवून द्या ना!, माझ्या गणपतीची सोंड बरोबर आहे ना ताई?, अरे देवा, उंदीरमामा राहिलाच की! अशा निरागस प्रश्नांनी आणि उत्साहाने डिकसळ येथील श्री संत बोधले महाराज प्राथमिक विद्यामंदिर शाळेचे पटांगण दुमदुमून गेले होते. निमित्त होते, रोटरी क्लब ऑफ कळंब सिटी यांच्यावतीने आयोजित 'आपला गणपती आपण बनवूया' या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळेचे. या कार्यशाळेत ३०० हून अधिक विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हातांनी शाडू मातीच्या सुबक गणेशमूर्ती साकारल्या.

प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) मूर्तींमुळे होणारे जलप्रदूषण आणि मूर्तींची विटंबना रोखण्यासाठी लहान मुलांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून रोटरी क्लब ऑफ कळंब सिटीने या कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कपड्यांवर आणि गालावर माती लागली तरी त्याची पर्वा न करता मुले मूर्ती बनवण्यात तल्लीन झाली होती.

यावेळी व्यासपीठावर रोटरी क्लब ऑफ कळंब सिटीचे अध्यक्ष डॉ. अभिजित जाधवर, सचिव श्याम जाधवर, प्रकल्प संचालक रवि नरहिरे व डॉ. सचिन पवार, रोटेरियन संजय देवडा, धर्मेंद्र शहा, निखिल भडंगे, सचिन डोलारे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रशिक्षक भोले सर व कु. विशाखा लिमकर यांनी विद्यार्थ्यांना गणपती बनवण्याचे सोप्या भाषेत प्रशिक्षण दिले. मुलांच्या असंख्य प्रश्नांना उत्तरे देत आणि त्यांच्या चुका दुरुस्त करत त्यांनी अत्यंत संयमाने मार्गदर्शन केले. मुलांचा उत्साह वाढवण्यासाठी शिक्षकांनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला.

कार्यशाळेच्या अखेरीस, मुलांनी स्वतः तयार केलेल्या मूर्ती घरी नेताना त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद अवर्णनीय होता. हा आनंद पाहून शिक्षक आणि पालकांच्या चेहऱ्यावरही समाधान फुलले होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक पोपट निकम, सहशिक्षक प्रदीप यादव, सज्जन बर्डे, किशोर वाघमारे, रमेश अंबिरकर, नामदेव झाडे, सुरज राऊत व शाळेतील विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

**नैसर्गिक रंगांचा वापर करा**

**पर्यावरणपूरक गणपती म्हणजे फक्त शाडू मातीची मूर्ती नव्हे. अनेकदा मूर्ती शाडूची असली तरी त्यावर रासायनिक अ‍ॅक्रेलिक रंग वापरले जातात, जे पर्यावरणासाठी हानिकारक आहेत. त्यामुळे मूर्ती तयार झाल्यावर तिला रंगवण्यासाठी गेरू, हळद, कुंकू, बुक्का, चंदन अशा नैसर्गिक रंगांचा वापर करावा. हे रंग मूर्तीला चिकटवण्यासाठी फेव्हिकॉलऐवजी नैसर्गिक डिंकाचा वापर करणे योग्य ठरते.**

**- विशाखा लिमकर, प्रशिक्षक**

**बालवयातच पर्यावरण रक्षणाचे संस्कार**

**पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची सुरुवात बालवयातच होणे आवश्यक आहे. 'आपला बाप्पा आपण बनवूया' यासारख्या कार्यशाळांमधून मुलांना पर्यावरणाचे महत्त्व कळते आणि त्यांच्यात एक चांगली सवय रुजते. हळूहळू या आवडीचे सवयीत रूपांतर होऊन एक पर्यावरणपूरक संस्कृती तयार होईल, याच उद्देशाने आम्ही ही कार्यशाळा आयोजित केली आहे.**

**- रवी नरहिरे, प्रकल्प संचालक, रोटरी क्लब**

## रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

मुरुम(प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत बाळु रा. नाईकनगर सु. ता. उमरगा यांनी दि.२४.०८.२०२५ रोजी आपल्या ताब्यातील अ‍ॅपे रिक्षा क्र एमएच २४ एल ९६१७ हा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पोस्ट ऑफीस मुरुम जाणारे रोडवर जिल्हा परिषद शाळेच्या समोर मुरुम येथे सार्वजनिक रोडवर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना मुरुम पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द भारतीय न्याय सहिंता कलम २८५ मोवाका अन्वये मुरुम पो.ठा. येथे गुन्हा नोंदवला आहे.

## धान्याचे गोडाऊन फोडून हरभरा चोरी करणाऱ्या एकास स्थानिक गुन्हे शाखेने केली अटक



धाराशिव (प्रतिनिधी)- दिनांक २३ रोजी माला विषयीचे गुन्हे उघडकीस आणणे अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि कासार व पथक हे पेट्रोलिंग करत असताना मिळालेल्या माहितीवरून संशयित गौस वय ५० वर्ष रा एकता नगर धाराशिव, ता जि धाराशिव याच्याकडे चोरीचा मुद्देमाल आहे, अशी बातमी मिळाल्यावर सदर आरोपीस त्याचे वाहनासह सिताफिने ताब्यात घेऊन त्याचे कडे चौकशी केली असता त्याने विनायक ग्रो मौजे किनी जिल्हा धाराशिव या धान्याच्या गोडाऊन चे शटर तोडून त्याच्या साथीधारासह हरभऱ्याचे कट्टे चोरी केले असल्याचे सांगितले. त्यावरून पोस्ट ढोकी गुन्हे अभिलेख तपासला असता पोस्टे ढोकी गुर नं २३५/ २५ कलम ३०५ अ ३३४ भान्यास अन्वये हरभऱ्याचे कट्टे चोरीस गेल्याचा गुन्हा दाखल असल्याचे दिसून आले. गौसकडे चोरीचा मुद्दे मालाबाबत चौकशी केली असता त्याने सदरचा मुद्देमाल आडत लाईन धाराशिव येथे विकला असल्याचे सांगितले त्यावरून सदर मुद्देमालाचा शोध घेऊन हरभऱ्याचे एकूण २५५९ किलो वजनाचे ४३ कट्टे आणि गुन्ह्यात वापरलेले अशोक लेलँड वाहन असा एकूण किंमत ६,२९,००० रुपये किमतीचा चा मुद्देमाल पंचनामा करून जप्त करण्यात आला आहे. आरोपीकडे केलेल्या चौकशीत त्याने त्याच्या अन्यसाथीदारांची नावे तसेच चोरी केलेल्या मुद्देमालाबाबत सविस्तर माहिती दिली आहे. ताब्यात असलेल्या आरोपीने त्याच्या अन्य साथीदाराच्या मदतीने सदर चा गुन्हा केल्याचे कबुली दिल्याने त्याची वैद्यकीय तपासणी करून रिपोर्ट सह पोलीस ठाणे, ढोकी येथे पुढील कारवाई कामी हजर केले आहे.

सदरची कामगीरी मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना. यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. विनोद इज्जपवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार, पोह शौकत पठाण,प्रकाश औताडे, जावेद काझी, फराहान पठाण, चापोका रत्नदीप डोंगरे, चापोका नागनाथ गुरव यांच्या पथकाने केली आहे.

## महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समितीची बैठक संपन्न



धाराशिव (प्रतिनिधी)- महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मुलन समिती शाखा धाराशिवची बैठक दि. २४/०८/२०२५ रोजी छत्रपती शिवाजी हायस्कूल, धाराशिव येथे संपन्न झाली. या बैठकीत अनिसाचे महाराष्ट्राचे सरचिटणीस उत्रेश्वर बिराजदार यांचे सुरुवातीस गुलाबाची फुले देवून स्वागत करण्यात आले. त्यांनी स्फुर्ती गित गाऊन बैठकीस सुरुवात केली. मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, विद्यान, निर्भयता, निती ही अनिसची विचारधारा आहे. अनिस व्यक्तीच्या शोषणाच्या विरोधात कार्य करते. वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रचार, प्रसार करते. ज्या वाईट रुढी, परंपरा आहेत त्याची चिकित्सा करते. व संत व समाजसुधारकांचा व संविधानाचा वैचारिक वारसा घेऊन प्रबोधनाचे कार्य करते. आता अनिसची भूमिका जनतेला पटू लागली आहे. स्वत: होवून अनिसच्या उपक्रमात लोक सहभागी होवू लागले आहेत. यावेळी अनिसचे अब्दूल लतीफ, गणेश वाघमारे, विजय गायकवाड, सिध्देश्वर बेलूरे, वामन पंडागळे, ड. अजय वाघाळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिध्देश्वर बेलुरे यांनी केले आभार विजय गायकवाड यांनी केले.

## मतदार जनजागरण समितीचा उपक्रम



धाराशिव (प्रतिनिधी)- मुख्याधिकारी निता अंधारे यांनी नुकताच नगरपालिकेचा पदभार स्वीकारला याबद्दल मतदार जनजागरण समितीच्यावतीने भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त संविधान जनजागरण उपक्रमात भारतीय संविधान उद्देशिका,विश्लेषण प्रत व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे संसद मधील भाषण व त्यांचा जीवन क्रम हे छोटेसे पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले.

हर घर संविधान या उपक्रमाच्या अनुषंगाने शासनाच्या वतीने हर घर संविधान या उपक्रमात संविधान उद्देशिका वाटप करण्यात येत असून या उद्देशिका बरोबरच उद्देशिका विश्लेषण प्रतीचे देखील वाटप करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली व यासह मतदार जनजागरण समितीच्यावतीने भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त करित असलेल्या भारतीय संविधान जनजागृती व दि.२६ नोव्हेंबर भारतीय संविधान दिनानिमित्त शहरातून भव्य अशी संविधान जनजागृती रॅली काढण्यात येते यासह अनेक विषयावर चर्चा देखील करण्यात आली,यावेळी मतदार जनजागरण समितीचे सचिव अब्दुल लतीफ, कार्याध्यक्ष गणेश वाघमारे कोषाध्यक्ष शेख रौफ,नवज्योत शिंगाडे सह इतर उपस्थित होते.

